वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./6338/२०२४ दिनांक :04/09/२०२४

-: प्रसिध्दीपत्रक :-

**गणेशोत्सव काळात पुणे शहरातील मध्यवर्ती भागात जड वाहनांचे वाहतूकीस बंदी बाबत**

पुणे शहरात गणेश उत्सव काळात नागरिकांची साहीत्य खरेदी व देखावे पाहण्यासाठी मोठया प्रमाणावर गर्दी होते. त्यामुळे सुरक्षेची उपाययोजना म्हणून व रस्त्यांवरून धावणा-या जड/अवजड वाहनांमुळे नागरिकांना असुरक्षितता निर्माण होवून त्यांचे जिवीतास धोका होवू नये तसेच पुणे शहरातील खालील ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम. व्ही.ए.० १९६/ ८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका, गणेशदेखावे वाहतूक करणारी वाहने इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**दिनांक ०५.०९.२०२४ रोजी पासून ते १८.०९.२०२४ पर्यत गणपती विसर्जना पर्यंत खालील नमुद रस्त्यांवर जड /अवजड वाहनांचे वाहतूकीस २४ तास बंदी करण्यात येत आहे.**

१) **शास्त्री रोड** - सेनादत्त चौकी चौक ते अलका चौक
२) **टिळक रोड** - जेधे चौक ते अलका चौक
३) **कुमठेकर रोड** - शनिपार ते अलका चौक
४) **लक्ष्मी रोड** - संत कबीर चौक ते अलका चौक
५) **केळकर रोड** - फुटका बुरुज ते अलका चौक
६) **बाजीराव रोड** - पुरम चौक ते गाडगीळ पुतळा
७) **शिवाजी रोड** - गाडगीळ पुतळा ते जेधे चौक
८) **कर्वे रोड** - नळस्टॉप चौक ते खंडोजीबाबा चौक
९) **फर्ग्युसन कॉलेज रोड** - खंडोजीबाबा चौक ते विर चाफेकर चौक
१०) **जंगली महाराज रोड** - स.गो.बर्वे चौक ते खंडोजीबाबा चौक
११) **सिंहगड रोड** - राजाराम ब्रिज ते सावरकर चौक
१२) **मुदलियार रोड/गणेश रोड**- पॉवरहाऊस-दारुवाला-जिजामाता चौक - फुटका बुरुज चौक

तरी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून गणेशोत्सव शांततेने पार पाडण्यास व वाहतुक सुरळीत ठेवण्यास पुणे शहर वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत**:- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर